दिनांक - १४/१०/२०२१

# प्रेसनोट

सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस दलाच्या आस्थापनेवरील एकुण २१ पोलीस शिपाई रिक्त पदांसाठी पोलीस भरतीकरिता सन २०१९ मध्ये जाहीरात देण्यात आलेली होती. सन २०१९ मध्ये पोलीस शिपाई पदाकरिता ज्या उमेदवारांनी आवेदन अर्ज सादर केले आहेत त्या उमेदवारांची OMR लेखी परीक्षा दिनांक १८/१०/२०२१ रोजी प्रवेशपत्रावर नमुद करण्यांत आलेल्या परीक्षा केंद्रांवर घेण्यात येणार आहे. **सदर परीक्षेसाठी उमेदवारांना त्यांचे प्रवेशपत्र ( HALL TICKET) उमेदवारांच्या ई-मेल वर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.** तसेच सदरचे प्रवेशपत्र **https://mhpolicebharti.cbtexam.in या पोर्टलवरुन देखील डाऊनलोड करता येतील.** उमेदवारांनी लेखी परीक्षेकरिता प्रवेशपत्रावर नमुद असलेल्या परीक्षा केंद्रावर ओळखपत्रासह ( उदा.आधारकार्ड, पॅनकार्ड, पासपोर्ट, वाहन चालक परवाना इ.) वेळेत उपस्थित रहावे. उमेदवारांना ओळखपत्र प्राप्त होण्याबाबत काही अडचण असल्यास त्यांनी खालील नमुद दूरध्वनी क्रमांकावर व ई-मेलवर संपर्क साधावा.

**मदतीसाठी संपर्क मोबाईल क्रमांक - १८००२१००३०९ ( सोमवार ते शनिवार सकाळी १०.०० ते सायंकाळी ०६.०० वाजे पर्यंत)**

**मदतीसाठी ई-मेल - bhartimahapolice@gmail.com**

**सिंधुदुर्ग पोलीस भरती मदत केंद्र कक्ष - ०२३६२-२२८००८**
**सिंधुदुर्ग पोलीस नियंत्रण कक्ष - ०२३६२२२८६१४**




( एस बी गावडे )
प्रभारी पोलीस उप अधीक्षक (मुख्या)
पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग करितां.